लोकमान्य सांजवार्ता, पुणे, मंगळवार, दि. ३ नोव्हेंबर २००९



# 'लेज' ची पन्नास लाखांची बक्षीस योजना

**पुणे : नमकीन स्नॅक्स उत्पादनांतील भारताचा अग्रणी ब्रॅन्ड लेजची 'तुमची सर्वाधिक पसंतीची चव सांगा' असे म्हणणारी ही मोहिम म्हणजे आजपर्यंत फ्रिटोले इंडियाने सादर केलेली सर्वात मोठी ग्राहक योजना आहे.**

तुमची सर्वाधिक पसंतीची चव सांगा ही प्रसिद्धीमोहिम जवळजवळ आठ महिने चालणार असून लेजच्या पोटॅटो चिप्ससाठी ग्राहकांच्या पसंतीचा नवा स्वाद शोधण्याचा प्रमुख उद्देश यामध्ये आहे. लेजच्या या नव्या कार्यक्रमात ग्राहकांना आपली पसंती तर सांगता येणारच आहे, पण त्याचबरोबर समृद्धी आणि प्रसिद्धी मिळविण्याची एक अनोखी संधीही त्यांच्यासाठी उपलब्ध होणार आहे. या मोहिमेतील विजेत्या ग्राहकास रु. ५० लाखांचे बक्षीस तसेच नवीन स्वादासह तयार केलेल्या लेजच्या उत्पन्नातील १ टक्का भागही दिला जाणार आहे. लेजचे हे नवे उत्पादन मे २०१० अखेरीस सादर केले जाईल. या आगळ्यावेगळ्या स्पर्धेत सेलिब्रिटी शेफ आदित्य बाल, जेडब्ल्यूटीच्या उपाध्यक्ष आणि कार्यकारी सृजनशील संचालिका तसेच लेखिका अनुजा चौहान आणि पेप्सिको इंडियाच्या संशोधन व निर्मिती विभागाचे संचालक डॉ. टी.एस. आर. मुरली यांचे तज्ज्ञमंडळ परिक्षकांचे काम पाहणार आहे.